# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)
" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४००

| कार्यालय संचालक (वैयक्तिक ) | दूरध्वनी<br>२२६२१०३१-३६<br>२२६२१००६ | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : dhs_epi@rediffmail.com<br>Fax No. 022- 22620234 (DHS) |
|---|---|---|
| | | क्र.:संआसे/साथरोग/स्वाईन फल्यू मार्गदर्शक सूचना/ कक्ष-६/ ८८७२-८७ /१५.दिनांक :२३.०७.२०१५. |


प्रति,

१) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये, पुणे/नागपूर/नाशिक/लातूर/औरंगाबाद.
२) कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुबई महानगरपालिका, मुंबई.

**विषयः- तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांना इन्फल्यूएन्झा लसीकरण करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना**

संदर्भः- महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची बैठक दि.२० जुलै २०१५ मध्ये देण्यात आलेल्या सूचना.

सन २००९ साली पॅन्डॅमिक इन्फल्यूएन्झा ए एच१ एन१ च्या उदयानंतर महाराष्ट्रात दरवर्षी ठळक स्वरुपात फल्यू रुग्ण आढळत आहेत. फल्यूमुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या रुग्णांची संख्याही लक्षणीय आहे. राज्यातील साथरोग परिस्थितीसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक ७ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना केली. या समितीने स्वाईन फल्यूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये गरोदर मातांचे प्रमाण लक्षणीय आहे हे लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांना इन्फल्यूएन्झा प्रतिबंधात्मक लस मोफत उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात गरोदर मातांचे हे लसीकरण राज्यातील ६ शहरांमध्ये निश्चित केलेल्या लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी करण्यात येईल. याचा तपशिल पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | शहर | इन्फल्यूएन्झा लसीकरण केंद्र |
|---|---|---|
| १ | मुंबई | कस्तुरबा रुग्णालय, मुंबई |
| २ | पुणे | जिल्हा रुग्णालय, पुणे |
| ३ | नाशिक | जिल्हा रुग्णालय, नाशिक |
| ४ | औरंगाबाद | शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, औरंगाबाद |
| ५ | लातूर | स्त्री रुग्णालय, लातूर |
| ६ | नागपूर | डागा रुग्णालय, नागपूर |

**इन्फल्यूएन्झा लसीचा प्रकार व माहिती -**

इंजेक्शनव्दारे द्यावयाची इन्फल्यूएन्झा लस (ट्रायवॅलेन्ट इनॲक्टीवेटेड इन्फल्यूएन्झा व्हॅक्सीन)

इन्फल्यूएन्झा लसीकरण मोहिमेसाठी पुरविण्यात आलेली लस इन्फल्यूएन्झा विषाणूच्या इन्फल्यूएन्झा ए प्रकारातील दोन उपजाती, एच १ एन१ व एच३ एन२ तसेच इन्फल्यूएन्झा बी विषाणूविरुध्द कार्य करते.

ही लस इन्फल्यूएन्झाच्या तीन उपजातीविरुध्द (इन्फल्यूएन्झा ए एच१ एन१, इन्फल्यूएन्झा ए एच३ एन२ आणि इन्फल्यूएन्झा बी) गुणकारी आहे.

वातावरणातील इन्फल्यूएन्झा विषाणू आणि लसीमध्ये वापरण्यात आलेला विषाणू यांच्यात जनुकीय साम्य असल्यास ही लस ७० -९० % उपयुक्त ठरते.

ही लस घेतल्यानंतर त्या व्यक्तीच्या शरीरात इन्फल्यूएन्झा विरोधी प्रतिकारशक्ती निर्माण होण्यास किमान दोन आठवडयाचा कालावधी लागतो. याप्रकारे मिळालेली प्रतिकार शक्ती अधिकात अधिक एक वर्षापर्यंत टिकू शकते. त्यामुळे हे लसीकरण दरवर्षी घेणे आवश्यक ठरते.

इन्फल्यूएन्झा रुग्ण मुख्यत्वे ऑगस्ट-सप्टेंबर आणि फेब्रूवारी-मार्च या कालावधीमध्ये आढळत असल्याने जुलै महिन्यात लस घेतल्यास येणाऱ्या दोन्हीही इन्फल्यूएन्झा सिझनमध्ये फल्यू आजारापासून संरक्षण मिळते.

## लस कशी दयावी ?

इन्फल्यूएन्झा लस ही सिंगल डोस प्री फिल्ड सिरिंज स्वरुपात पुरविण्यात आली आहे. लसीचा डोस ०.५ मिली आहे. ही लस गरोदर मातेस इन्ट्रामस्क्युलर देण्यात यावी. मातेला धनुर्वात प्रतिबंधक लस दयावयाची असल्यास या दोन लशी वेगवेगळया ठिकाणी (वेगवेगळया हाताला) देण्यात याव्यात.

## लसीचा साठा कसा करावा ?

ही लस आय.एल.आर. मध्ये २° ते ८° सेल्सिअस तापमानामध्ये ठेवावी. सदरची लस कोणत्याही परिस्थितीत डीप फ्रिजरमध्ये ठेवू नये.

## लस देताना घ्यावयाची दक्षता -

- लसीमध्ये असलेल्या क्रियाशील घटकाची ॲलर्जी असलेल्या व्यक्तींना ही लस देऊ नये
- लसीकरण लाभार्थीस ताप अथवा संसर्गाची लक्षणे असल्यास अशा व्यक्तीचे लसीकरण ती व्यक्ती पूर्णपणे बरी होईपर्यंत पुढे ढकलावे.
- लसीकरण लाभार्थींनी आपण घेत असलेल्या अथवा नुकत्याच घेतलेल्या औषधांची /इतर लसींची माहिती देणे आवश्यक आहे.
- लसीकरण लाभार्थी स्टिरॉईडस् अथवा सायटोटॉक्सीक औषधे घेत असेल तर प्रतिकारशक्ती निर्माण होण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात.

## लसीकरणानंतर उदभवणाऱ्या प्रतिक्रिया -

लसीकरणानंतर काही व्यक्तींना सर्वसाधारण पुढीलं प्रतिक्रिया उदभवू शकतात.

- ✓ डोकेदुखी.
- ✓ घांम येणे.
- ✓ स्नायू अथवा सांध्यांमध्ये वेदना.
- ✓ ताप, बरे न वाटणे, थंडी वाजणे, थकवा.
- ✓ स्थानिक प्रतिक्रिया - लसीकरण दिल्याचे जागी व अवतीभोवती लालसरपणा, सूज, वेदना.

सर्वसाधारणपणे या प्रतिक्रिया उपचाराशिवायही एक ते दोन दिवसात कमी होतात. या सर्वसामान्य प्रतिक्रियांशिवाय काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये गंभीर स्वरुपाची ॲलर्जीक प्रतिक्रिया, गिया बारी सिंड्रोम, रक्तपेशी कमी होणे अथवा इतर प्रतिक्रियाही आढळू

शकतात. अधिक माहितीसाठी लसीसोबत उत्पादकाने दिलेल्या माहितीपत्रकाचा अभ्यास करावा.

नियमित लसीकरणाप्रमाणेच इन्फल्यूएन्झा लसीकरणानंतर उदभवणाऱ्या प्रतिक्रियांची (ए.ई.एफ.आय.) माहिती या अनुषंगाने देण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये राज्य तसेच केंद्र सरकारला कळविणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

**गरोदर माता इन्फल्यूएन्झा लसीकरण – कार्यपध्दती –**

- लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्वावर राज्यातील ६ शहरांमधील केवळ तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांना लसीकरण करण्यात येईल.
- ही शहरे ज्या जिल्हा शल्य चिकित्सकाच्या अधिनस्त आहेत त्यांच्याकडे लसीचा साठा देण्यात येईल.
- या शहरातील निवडलेल्या रुग्णालयामध्ये गरोदर माता लसीकरणासाठी ए.एन.सी. क्लिनिकच्या ठिकाणी वेगळा लसीकरण काऊंटर उघडावा. या लसीकरण काऊंटरच्या ठिकाणी दर्शनी भागात " **गरोदर मातांसाठी (तिसऱ्या तिमाहीतील) ऐच्छिक स्वाईन फल्यू लसीकरण केंद्र** " असा ठळक फलक लावावा.
- हे तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांसाठीचे ऐच्छिक स्वाईन फल्यू लसीकरण केंद्र ए. एन.सी तपासणीच्या दिवशी सुरु ठेवावे.
- या लसीकरण केंद्रावर लसीकरणासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची नेमणूक करावी. रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्यास या लसीकरण केंद्राचे प्रमुख म्हणून नियुक्त करावे. लसीचे प्रशिक्षण सहसंचालक, आरोग्य सेवा, (हि.ह व ज.रो.) पुणे यांचेमार्फत देण्यात येईल. **या प्रशिक्षणानंतरच लसीकरण सुरु करावे.**
- प्रत्येक रुग्णालयाने लस नोंदणीसाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

  १) गरोदर मातेची लसीकरण नोंदणी – गरोदर मातेच्या ए.एन.सी. कार्डवर फल्यू लसीकरणाची नोंदणी करण्यासाठी खालीलप्रमाणे शिक्का तयार करावा.

| | |
|---|---|
| INFLUENZA IMMUNISATION | |
| Date | ANC Weeks |
| Name of Manufacturer | |
| Batch No. | |
| Date of Mfg. | Date of Expiry |
| लसीकरणानंतर काही त्रास झाल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. | |
| फोन नंबर– | |

लसीकरणानंतर वरील शिक्क्यावर सर्व माहिती व्यवस्थित भरावी.

२) लसीकरण झाल्यावर एखादया मातेस काही त्रास झाल्यास संपर्क साधण्यासाठी शिक्क्यावर लसीकरण केंद्राच्या प्रमुख वैद्यकिय अधिकाऱ्याचा फोन नंबर देण्यात यावा. त्याची माहिती सर्व लसीकरण लाभार्थींना दयावी.

३) परिशिष्ट– ३ मध्ये दिलेले संदेश लसीकरण सत्राच्या ठिकाणी दर्शनी भागात लावावेत.

- इन्फल्यूएन्झा लसीकरणासाठी आलेल्या लाभार्थींची माहिती वेगळया रजिस्टरमध्ये नोंदवावी. नोंदणी प्रपत्र परिशिष्ट -१ मध्ये जोडले आहे.
- लसीकरणाचा दैनंदिन अहवाल जिल्हा शल्य चिकित्सकाकडून उपसंचालकामार्फत सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांना सादर करण्यात येईल. लसीकरण दैनंदिन अहवाल प्रपत्र परिशिष्ट -२ मध्ये देण्यात आले आहे.
- लसीकरण सत्राच्या ठिकाणी संभाव्य प्रतिक्रियावर उपचार देण्यासाठी इमर्जन्सी ट्रे तयार ठेवावा तसेच तातडीच्या रुग्ण व्यवस्थापनाकरीता आवश्यक साधने व उपकरणे उपलब्ध ठेवावीत.
- लस दिल्यानंतर मोकळया झालेल्या सिरिंजेस आणि इतर बार्बीची जैव वैद्यकिय कचरा व्यवस्थापन नियमावली नुसार विल्हेवाट लावावी.

वर दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन आपण आपल्या कार्यक्षेत्रातील तिसऱ्या तिमाहीतील गरोदर माता इन्फल्यूएन्झा लसीकरण मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. या मोहिमेसंदर्भात आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे जनजागृती करावी. मोहिमेचा दैनंदिन अहवाल jdhsh@rediffmail.com आणि pulsepolio@gmail.com या ई-मेल वर रोज संध्याकाळी ५.०० वाजता सादर करावा.

संचालक, आरोग्य सेवा,
मुंबई.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव -**

१) उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळे, ठाणे/पुणे/नागपूर/नाशिक/लातूर/औरंगाबाद
२/-आपल्या विभागातील इन्फल्यूएन्झा लसीकरण मोहिमेचे नियोजन व अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांनुसार होईल याकरिता व्यक्तिशः लक्ष दयावे.

२) सहसंचालक, आरोग्य सेवा, (हि.ह.व ज.रो.)पुणे.

३) अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे.
२/-लसीकरण हा विषय आपल्या विभागाशी संबंधित असल्याने इन्फल्यूएन्झा लसीकरण मोहिमेबाबत आपल्या स्तरावरुन या मोहिमेचे संनियंत्रण व पर्यवेक्षण केले जावे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

डॉ.सुभाष साळुंके, अध्यक्ष, महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती.
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

## परिशिष्ट –१

## ऐच्छिक स्वाईन फल्यू लसीकरण केंद्र

## नोंदवही प्रपत्र

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | | लसीकरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नाव | १ | | | | |
| | | | २ | | | | |
| | | | ३ | | | | |
| रुग्णालयाचे नाव | | | | | | | |
| लसीची माहिती | | | | | | | |
| कंपनीचे नाव | | लसीचे मिळालेले एकूण डोस | | | | | |
| बॅच नंबर | | लसीचे वापरलेले डोस | | | | | |
| निर्मिती तारीख | | परत करण्यात आलेले लसीचे डोस | | | | | |
| मुदतबाहय तारीख | | | | | | | |

| अ. क्र. | गरोदर मातेचे नाव | वय | पत्ता | खेप | गरोदरपणाचा महिना | इतर आजार | ॲलर्जीचा इतिहास | सध्या कोणती औषधे चालू आहेत काय ? | नुकतेच इतर कोणते लसीकरण झाले असल्यास लसीचे नाव व तारीख. | संपर्क क्रमांक | लसीकरणानंतर काही प्रतिक्रिया उदभवली असल्यास त्याचा तपशिल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट -२
## ऐच्छिक इन्फल्यूएन्झा लसीकरण अहवाल.

दिनांक -

रुग्णालयाचे नाव व पत्ता -

| दैनंदिन | | | प्रगतीपर | | | लसीचा हिशोब | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फल्यू लसीकरणासाठी आलेल्या गरोदर माता | फल्यू लसीकरण दिलेल्या गरोदर माता | लसीकरणानंतर प्रतिक्रिया उदभवलेल्या गरोदर माता | फल्यू लसीकरणासाठी आलेल्या गरोदर माता | फल्यू लसीकरण दिलेल्या गरोदर माता | लसीकरणानंतर प्रतिक्रिया उदभवलेल्या गरोदर माता | एकूण उपलब्ध डोस | आजपर्यंत वापरलेले लसीचे डोस | आज अखेर शिल्लक लस डोस |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

## परिशिष्ट –३

### इन्फल्यूएन्झा लसीकरणासाठी येणाऱ्या लाभार्थींना दयावयाची माहिती.

१) फल्यू आजार तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांमध्ये गंभीर स्वरुप धारण करतो, त्यामुळे त्यांनी ही लस घेणे लाभदायक आहे.

२) फल्यू लसीकरण हे पूर्णपणे ऐच्छिक स्वरुपाचे आहे.

३) या लसीचा गर्भावर विपरीत परिणाम होत नाही.

४) ही लस त्रिगुणी असून ती फल्यूच्या तीन प्रकारच्या उपजातीविरुध्द आहे.

५) ही लस घेतल्यानंतर फल्यू विरोधी प्रतिकारशक्ती तयार होण्यास किमान २ आठवडयांचा काळ लागतो.

६) या लसीमुळे मिळणारी प्रतिकारशक्ती ८ महिने ते एक वर्षापर्यंत टिकते.

७) फल्यू टाळण्यासाठी फल्यू विरोधी लसीकरणाचा फायदा होतो हे खरे असले तरीही ही लस घेऊनही काही व्यक्तींना फल्यू होऊ शकतो.

८) या लसीमुळे काही जणांना ताप येणे, थकवा, ॲलर्जी, इंजेक्शनच्या जागी सूज येणे, अंग खाजविणे अथवा इतर प्रकारचा त्रास होऊ शकतो.